महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# बारामती परिमंडळ, बारामती.

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–१७/०१/२०१९
आदेश तारीख :–१४/०३/२०१९

**आदेश**

केस क्र. ०२/२०१९

| | |
|---|---|
| १) श्री.राजेंद्र पांडूरंग फाळके.,<br>मु.पो. पुसेगाव, ता. खटाव,<br>जि. सातारा–४१५५०२. | तक्रार अर्जदार (ग्राहक) |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता.,<br>म.रा.वि.वि.कं.मर्या,<br>वडूज विभागीय कार्यालय. | विरुध्द पक्षकार (महावितरण) |

कोरम:– १) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

उपस्थिती:– १) श्री.राजेंद्र पांडूरंग फाळके, ग्राहक
२) श्री. के. डी. डोईफोडे, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. खटाव उपविभाग.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## तक्रारीचे स्वरुप

१) तक्रारदार ग्राहक श्री.राजेंद्र पांडूरंग फांळके, मु.पो. पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा ग्राहक क्र. २०१८६००२१७१० वीज जोड दुध संकलन व शितकरणासाठी असून वर्गवारी औद्योगिक आहे. भरारी पथक सातारा यांनी स्थळ तपासणी केली औद्योगिक ऐवजी व्यवसायिक वर्गवारी लागू करुन दिलेले फरकाचे बील व व्यवसायिक वर्गवारीने येणारी वीज देयक रद्द करुन पुन्हा औद्योगिक वर्गवारी लागू करावी अशी तक्रार दाखल केली आहे.

## तक्रार अर्जदार (ग्राहक) यांचा तोंडी म्हणणे

श्री. राजेद्रं पांडूरंग फाळके यांनी खालील प्रमाणे तोंडी युक्तीवाद केला दि. ०६/०५/२००५ रोजी ग्रा.क्र. २०१८६००२१७१० ने ५ एचपीचा वीज जोड भार दुध संकलन व शितकरण प्रक्रियासाठी घेतलेला आतापर्यंत आद्योगिक वर्गवारीने येणारी वीज देयके नियमित भरली आहेत.

दिनांक २८/१२/२०१७ रोजी भरारी पथक सातारा यांनी स्थळ तपासणी करुन जून २०१६ ते जानेवारी २०१८ या कालवधीतील औद्योगिक ते व्यवसायिक वर्गवारी करुन ९१५७१ युनिट फरक दाखवून फेंब्रुवारी २०१८ पासून व्यवसायिक वर्गवारीने वीज देयक सुरु करणेचा आहवाल दिनांक २४/०१/२०१८ रोजी उपकार्यकारी अभियंता महावितरण खटाव यांना सादर केला त्यानुसार महावितरणने जून २०१५ ते जानेवारी २०१८ या कालावधीतील औद्योगिक ते व्यवसायिक वर्गवारी फरकाचेबील रुपये ५,४०,५२९.४९एवढे देवून फेब्रुवारी २०१८ पासून व्यवसायिक वर्गवारीने वीज देयके दिलेली आहे सदर बीले मी भरलेली आहेत.

मी ५ एच.पी वीज जोड भार हा दुध संकलन व दुध शितकरणासाठी घेतलेला आहे दुध डेअरीला पोहोच करे पर्यंत खराब होऊ नये म्हणून ३ अंश ते ४ अंश सेल्सीयस तापमानावर ठेवले जाते दुधसंकलनासाठी अत्यंत अल्प वीज वापर होतो. सोबत दुध थंड करण्याच्या मशिनरीचे फोटोग्राफ सादर केले आहेत. सध्या दुध व्यवसाय अत्यंत धोक्यात असून व्यवसायिक वर्गवारीने परवडणारा नाही.

अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या असमाधानकारक निकालामुळे व्यथीत होऊन आपणाकडे तक्रार दाखल केली आहे.

MERC केस क्र. १२१/२०१४ दि. २६/०६/२०१५ च्या LT V (B) Industry General मधील Milk Processing/Chilling Plants (Dairy) आद्योगिक वर्गवारी लागू करुन जून २०१५ ते जानेवारी २०१८ या कालावधीतील आद्योगिक ते व्यवसायिक वर्गवारी फरकाचे बील रुपये ५,४०,५२९.४९ रद्द करावे व फेब्रुवारी २०१८ पासून व्यवयायिक वर्गवारीने भरलेल्या बीलामधील फरक व्याजासह मिळावा.

## विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

श्री. राजेद्रं पांडूरंग फाळक, मु.पो. पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा. यांचा ५ एचपी वीज जोडभार ग्राहक क्र. २०१८६००२१७१० ने दिनांक ०६/०५/२००५ रोजी मंजूर केलेला आहे. सदर वीज जोडभार हा दुध संकलनासाठी आहे.

भरारी पथक सातारा यांचे पत्र अति. का.अ./फिरत पथक/सातारा/७३ दि. २४/११/०१८ अन्वये दि. २८. १२.२०१७ रोजीच्या स्थळ तपासणी अहवालानुसार तसेच ग्राहकाच्या प्रत्यक्ष वापरानुसार सदरचे ग्राहक हे दुध संकलनासाठी विद्युत पुरवठयाचा वापर करीत आहेत. वाणिज्य परिपत्रक क्र.२४३ दि. ०३/०७/२०१५ आणि केस क्र. १२१/२०१४ साठीचा MERC Tariff Order दि. २६/०६/२०१५ अनुसार अशा प्रकारचा सदरील ठिकाणी डेअरी कारणासाठी कोणत्याही प्रकारची दुग्ध पक्रिया/शितकरण नसल्याचे आढळून आले सदर ठिकाणी दुध संकलन करुन संकलन चालू असताना दुध खराब होऊ नये या कारणासाठी ३ अंश ते ४ अंश सेल्सीयस तापमानावर मोठया टॅकमध्ये साठविले जाते. आणि दुध संकलन झाल्यावर डेअरीकडे वहातूक करण्यात येते. त्यावरुन सदर ठिकाणी दुध संकलन वहातुक व विक्री या क्रिया होत असल्याने सदर ग्राहकाला वाणिज्य वर्गवारी प्रस्तावित करण्यात आली. तसेच जून २०१५ पासून फरकाच्या रकमेचे देयक प्रस्तावीत करण्यात आले.

त्यानुसार उपकार्यकारी अभियंता खटाव उपविभाग यांचे कार्यालयाकडून पत्र क्र. उप.काअ/खटाव/बिलिंग/ १६२ दि. १९.०३.२०१८ अनुसार जून २०१५ ते जानेवारी २०१८ कालावधीतील ९१५७१ युनिटचे आद्योगिक ऐवजी वाणिज्य वर्गवारीचे रुपये ५,४०,५२९.४९ एवढया रक्मेच फरकाचे वजी देयक देण्यात आले आहे. तसेच फेंब्रुवारी २०१८ पासून वाणिज्य दर आकारणी करण्यात येत आहे.

## कारणमिमांसा

१) तक्रारदार ग्राहकाचा ५ एचपी मंजूर भार असून वापर ५ एचपी आहे. पैकी दुध संकलन करणे यासाठी अत्यल्प वीज वापर होतो. ५ एचपी जोडभाराचा वापर दुध संकलन करुन दुध पुढे डेअरीला पोहोच करेपर्यत खराब होऊ नये यासाठी ३ अंश ते ४ अंश सेल्सीयस तापमानावर ठेवले जाते ही प्राथमिक दुग्ध प्रक्रियाच आहे. तक्रारदार ग्राहाकाने दुध थंड करण्याच्या मशिनरीचे फोटो ग्राफ सादर केले आहेत. सदर ठिकाणी दुध गोळा करुन योग्य सेल्सीयस तापमानावर थंड केले जाते त्यामुळे सदरचे दुध संकलन व दुध शितकरण यास व्यवयायिक वर्गवारी लागू होत नाही. MERC केस क्र. १२१/२०१४ दि. २६/०६/२०१५ च्या वर्गवरी

ओदशानुसार LT V (B) Industry General मधील लागू क्लॉज (B) Milk Processing/Chilling Plants (Dairy) आद्योगिक वर्गवारी लागू होत आहे.

तसेच फेब्रुवारी २०१८ पासून ग्राहकाने भरलेल्या वीज देयकातील फरक मिळणेस ग्राहक पात्र आहे मंच पुढील प्रमाणे ओदश करीत आहे.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) जून २०१५ ते जानेवारी २०१८ या कालावधीतील आद्योगिक ते वाणिज्य वर्गवारी फरकाचे बील रु. ५,४०,५२९,४९ रद्द करण्यात येत आहे.

३) ***LT V (B)*** आद्योगिक वर्गवारी लागू करुन पुढील वीज देयके औद्योगिक वर्गवारीने देण्यात यावीत.

४) वरील आदेशाचे पालन करुन आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसाचे आत मंचास अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| (श्री. बी. डी. गायकवाड) | (श्री. एस. के. जाधव ) | (श्री. एम. ए. लवटे ) |
| अध्यक्ष | ग्राहक सदस्य, | सदस्य सचिव |